# प्रेसनोट

## सचिन विठ्ठलराव राठोड, वय–३०वर्षे पद–पोउपनि, व २) निवृत्ती एकनाथराव येवले, वय ५३ वर्षे, पद –पोलीस हवालदार दोन्ही नेमणुक पो.स्टे. कोंढाली जि. नागपूर ग्रामीण यांचेविरूध्द २०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्यावरून गुन्हा दाखल.

तक्रारदार हे नागपूर येथील रहीवासी असुन त्यांचे वडील तहसिल कार्यालय काटोल येथे दस्ताऐवज लेखक (अर्जनविस) आहेत. पो.स्टे. कोंढाली जि. नागपूर ग्रामीण येथे अप क्र. ५२/१८ कलम ४१६,४२०,४६५,४६८,४७१,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयात तक्रारदार यांचे वडील यांना आरोपी न करण्याकरिता तसेच त्यांचे सोबत काम करणारे इतर दोघांना सदर गुन्हयात अटक न करता अटकपूर्व जामीन मिळण्याकरिता मा. न्यायालयात अनुकुल से (Say) सादर करण्याकरिता सचिन विठ्ठलराव राठोड, पोउपनि, व २) निवृत्ती एकनाथराव येवले, पोलीस हवालदार दोन्ही नेमणुक पो.स्टे. कोंढाली जि. नागपूर ग्रामीण यांनी तक्रारदारास २०,०००/– रूपये मागणी केली. तक्रारदार यांची सचिन विठ्ठलराव राठोड, व २) निवृत्ती एकनाथराव येवले यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे तक्रार नोंदविली. .

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारी वरून दि. १६/०४/२०१८ रोजी सापळा कार्यवाही चे आयोजन केले असता सापळा पडताळणी दरम्यान सचिन विठ्ठलराव राठोड, पोउपनि, व २) निवृत्ती एकनाथराव येवले, पोलीस हवालदार दोन्ही नेमणुक पो.स्टे. कोंढाली जि. नागपूर ग्रामीण यांनी वरील कामाकरिता तक्रारदाराकडुन रू २०,०००/–लाचेची मागणी करून निवृत्ती एकनाथराव येवले, पोलीस हवालदार यांनी लाचरक्कम स्विकारली. यावरून दोन्ही आरोपीविरूध्द पो. स्टे. कोंढाली येथे लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB NAGPUR 7040222221
LANDLINE NO 0712/2561520
TOLL NO 1064
Website: www.acbmaharashtra.gov.in
Mobile app: www.acbmaharashtra.net
Facebook page: www.facebook.com/MaharashtraACB
Whatsapp: 9930997700

(रोशन यादव)
वाचक पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर
मो.नं. ९९२३३५५२३९